MMRC

## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्ग

## मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काळबादेवी- गिरगाव पुनर्वसन योजनेवरील माहितीपुस्तिकेचे प्रकाशन

**मुंबई, १० मार्च २०१९ –** मेट्रो ३ प्रकल्पामुळे काळबादेवी आणि गिरगाव भागातील प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसन योजनेवर तयार केलेल्या माहितीपुस्तिकेचे आज मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

काळबादेवी-गिरगाव प्रकल्पबाधितांसाठी राबविण्यात येत असलेल्या पुनर्वसन व पुनर्विकास योजनेची इत्यंभूत माहितीचा या पुस्तिकेत समावेश केला गेला आहे.
मुंबई मेट्रो ३ मार्गिकेतील गिरगाव आणि काळबादेवी ही भूमिगत मेट्रो स्थानके अतिशय दाटीवाटीच्या ठिकाणी आहेत. ही स्थानके जरी पूर्णतः भूमिगत असली तरी स्थानकाचे प्रवेशद्वार, निकासस्थान, व्हेंटिलेटशन शाफ्ट आणि इतर सहाय्यक इमारती या जमिनीवर असणार आहेत, त्यासाठी तात्पुरत्या तसेच कायमस्वरूपी भूसंपादनाची आवश्यकता होती. यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ).द्वारे विकास नियंत्रण अधिनियम (३३/७) बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत काळबादेवी-गिरगाव प्रकल्पबाधितांसाठी पुनर्वसन योजना आराखडा तयार केला व त्यास महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली. या योजने अंतर्गत काळबादेवी-गिरगाव येथील प्रकल्पबाधित कुटुंबाचे ते राहत असलेल्या ठिकाणीच पुनर्वसन होणार आहे. ज्यामध्ये ३०० चौ फु पर्यंतच्या घरांच्या बदल्यात दुप्पट आकाराची घरे तर ३०० ते ४४४.४४ चौ.फु घरांच्या बदल्यात ६०० चौ फु क्षेत्राची घरे तसेच ४४४.४४ चौ.फु पेक्षा जास्त क्षेत्राच्या घरांच्या बदल्यात ३५%अधिक क्षेत्राची प्रकल्पबाधित कुटुंबाना देण्यात येणार आहेत. तसेच व्यावसायिक प्रकल्पबाधिताना २०% अधिक क्षेत्रफळाची जागा मिळणार आहे.

काळबादेवी आणि गिरगाव या विभागात काळबादेवीसाठी के-१, के-२, आणि के-३ तर गिरगाव विभागासाठी जी-१, जी-२ आणि जी-३ अशा ६ विलग असणाऱ्या भूखंडांचा एकत्रित विचार करून त्यावरील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन के-२, के-३ आणि जी-३ या ब्लॉक्स मध्ये करण्याची योजना आखण्यात आली आहे. यामध्ये के-२, के-३ व जी-३ येथे अनुक्रमे काळबादेवी व्यावसायिक केंद्र, काळबादेवी हाईट्स, गिरगाव हाईट्स या नावाने पुनर्विकास योजना राबविण्याचे प्रस्तावित केले आहे. विशेष म्हणजे गिरगाव आणि काळबादेवी मेट्रो स्थानकांची बांधणी याच इमारतीखाली होणार आहे. प्रकल्पबाधित इमारती पाडण्याचे काम सुरू झाले आहे.
काळबादेवी-गिरगाव येथील २० जागांवरील ३० इमारतीतील एकूण ७१२ कुटुंब मेट्रो-३ प्रकल्पामुळे बाधित होणार आहेत त्यापैकी ६५७ प्रकल्पबाधितानी मुं.मे.रे.कॉशी पर्यायी निवासासाठी करार केले आहेत व त्यापैकी ६०५ कुटुंबाना मुं.मे.रे.कॉ तर्फे तात्पुरती घरे अथवा

घरभाडे देण्यात आले आहे. उर्वरित कुटुंबांच्या तात्पुरत्या विस्थापनाची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी काळबादेवी गिरगावसाठी मुं.मे.रे.कॉने तयार केलेल्या पुनर्विकास योजनेचे कौतुक केले आणि वेगवान बांधकामासाठी नवीनतम तंत्रज्ञानाचा वापर करावा असे देखील सुचविले.

याप्रसंगी मुं.मे.रे.कॉ.च्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या "मुंबई मेट्रो ३ प्रकल्पामध्ये गिरगाव आणि काळबादेवी ही सर्वात महत्त्वाची मेट्रो स्थानके आहेत. काळबादेवी-गिरगाव येथील प्रकल्पबधितांचे पुनर्वसन ज्या पद्धतीने व ज्या गतीने होत आहे त्याविषयी आनंद वाटतो. त्याप्रमाणेच येथील रहिवाशांचे हा प्रकल्प समजून आम्हाला सहकार्य केलं त्याबद्दल त्यांचे विशेष आभारी आहोत."